

ज्ञान - विज्ञान विमुक्तये

**विद्यापीठ अनुदान आयोग**
**आणि**
**शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,**
**दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र**

**२७ व २८ जानेवारी २०१७**

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

## स्मरणिका



मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

संपादक
डॉ. दादाराव गुंडरे

सहसंपादक
प्रा. दीपक सूर्यवंशी
डॉ. केदार काळवणे

Scanned with OKEN Scanner

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

प्रथम आवृत्ती : जानेवारी २०१७

**प्रकाशक :**

आदित्य प्रकाशन,

लातूर

**मार्गदर्शक :**

प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

**संपादक :**

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे

**सहसंपादक :**

प्रा. दीपक सूर्यवंशी

डॉ. केदार काळवणे

**अक्षरजुळणी :**

श्री गणेश सातपुते

कळंब (मो. ९७६६८५३२३७)

**किंमत :**

२००/-

ISBN : ९७८-९३-८३१०९-२६-५

या स्मरणिकेत प्रकाशित झालेले लेख संबंधीत लेखकांचे असून त्यासाठी संपादक,
सहसंपा...

# अनुक्रमणिका

## ग्रामीण व दलीत साहित्याचे आविष्करण


१. रंगनाथ पठारे व भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीतील पुरूष व्यक्तिरेखा : एक आकलन — १

*प्रा. डॉ. भारत हंडीबाग*

२. भास्कर चंदनशिव यांच्या कथा साहित्यातील समाजदर्शन — ११

*प्रा. डॉ. मारोती कसाब*

३. समकालीन मराठी ग्रामीण कथा — १७

*प्रा. डॉ. जयद्रथ जाधव*

४. समकालीन साहित्य : वाङ्मय प्रकारातील आविष्करण — २७

*प्रा. डॉ. गणेश मोहिते*

५. समकालीन नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी आणि समाज — ३८

*प्राचार्या डॉ. आशा मुंडे आणि प्रा. डॉ. संग्राम टेकले*

६. समकालीन ग्रामीण साहित्य आणि समाज — ४७

*प्रा. डॉ. संतोष देशमुख*

७. समकालीन वास्तव विशद करणाऱ्या ग्रामीण कादंबऱ्या — ५१

*प्रा. ढास रविंद्र बाबासाहेब*

८. १९९० नंतरच्या ग्रामीण समाजाचे चित्रण — ५६

*प्रा. डॉ. जयदेवी पवार*

९. १९६० नंतरची दलित कादंबरी व ग्रामीण कादंबरी : एक दृष्टीक्षेप — ६१

*प्रा. डॉ. अत्तार अमजद हारूण*

१०. समकालीन ग्रामीण कथा — ६६

*प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे*




Scanned with OKEN Scanner

- ४ -

# समकालीन साहित्य : वाङ्मय प्रकारातील आविष्करण

**प्रा. डॉ. गणेश मोहिते**
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना :**

१९६० नंतर आलेल्या दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, आदिवासी साहित्य प्रवाहाने मध्यमवर्गीयांच्या सुख-दुःखाच्या चौकटीत अडकलेल्या मराठी साहित्याला डोळस दृष्टी देऊन सर्वव्यापी चिंतनास भाग पाडले. समकालीन काळाशी, समाजाशी त्यास जोडले. व्यक्ती, समूह,समूहातील व्यक्ती, त्यांच्याभोवतीची परिस्थिती, त्यांच्या उक्ती आणि कृती, त्यांचे परिणाम, व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, व्यक्तीचे आणि समूहाचे नाते अशा विविध पातळ्यावरील जीवनाचा शोध लेखक घेऊ लागले. समकालीन जगण्याचा संदर्भ प्रामुख्याने साहित्य प्रकट करू लागले. साहित्याला बळ देणाऱ्या समकालीन समाजस्थितीचा विचार करताना १९६०-७० ची दशके ही जनआंदोलनाने प्रभावित झालेली दिसतात. १९६० पूर्वी काही वर्षे सुरू असलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची परिणती महाराष्ट्र राज्यात झाली. १९६६ साली शिवसेनेचा उदय झाला. याच दशकात मार्क्सवाद प्रभावित संघटनाही कार्यरत होत्या. ग्रामीण, आदिवासी, दलित, शेतमजूर यांनी आपल्या हक्कांसाठी दिलेले लढेही या काळात आढळतात. ७० च्या दशकात शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत न घेणाऱ्या बऱ्याच संघटना उदयाला आल्या आणि त्या ग्रामीण पातळीवर काम करू लागल्या.

१९७२ च्या आसपास दलित पँथरचा जन्म झाला. श्रमिक संघटना, कष्टकरी संघटना, श्रमिक मुक्ती संघटना, श्रमिक क्रांती संघटना इ. शोषित आणि



Scanned with OKEN Scanner